# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर


MERC/ADM/RTI/018/2022/**0168** Dt. 20.04.2022

प्रति,
श्री. चतुरसेन टिपाना डावरे
२६३/५, रमजान भटार चाळ,
डॉ. आंबेडकर चौक, कुर्ला (प.),
मुंबई ४०००७०.

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. ०८.०४.२०२२ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि.०८.०४.२०२२ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | बेकायदेशीर लाईट मिटर काढून बिना रिडींगचे पैसे वसूल करणे- अदानी कंपनीने ईलेक्ट्रीसीटी ॲक्ट २००३ प्रमाणे कोणतीही नोटीस न देता मिटर काढून घेऊन गेले व बिना रिडींगचे पैसे बिलावरील थकबाकी अशी दोन्ही रक्कम जबरदस्ती मागण्यात आले.<br><br>मी आपल्या कार्यालयाकडे डिसेंबर (दि.२.१२.२०२१) महिन्यात आपल्या कार्यालयाकडे पत्र पाठविलेले आहे. तरी त्याबाबत कारवाई झाल्याची माहिती मिळालेली नाही तसेच अदानी कंपनीचे अधिकारी माझ्याकडे घरी येऊन दम देऊन बिना रिडींगचे अंदाजे २०००/- (दोन हजार) भरा आणि मिटरची थकबाकी ८०००/- (आठ हजार) असे मिळून १०,५३८/- माझ्याकडून वसूल केले आहे. रिडींगच्या बाबतीत माहिती दिली नाही. १७.०२.२०२२ रोजी नविन मिटर बसविण्यात आला आहे. सोबत पेपरचे कटिंग जोडत आहे व बिल. | आपणांस नेमकी कोणती माहिती हवी आहे याचे बोध होत नाही.. कृपया माहितीचा अधिकार अधिनियम कलम 2 मधील उपखंड (च) प्रमाणे माहिती मागावी. जेणे करुन जन माहिती अधिकारी यांना आपणांस योग्य माहिती पुरविणे शक्य होईल.<br><br>माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये प्रकरण 1 मधील 2 (च) नुसार "माहिती" (Information) याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने (Memoes), ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने, (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणांस |

| | | |
|---|---|---|
| | | मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.<br><br>तसेच आपला दि.०२.१२.२०२१ रोजीचा अर्ज पुढील कार्यवाहीकरिता अदाणी इलेक्ट्रीसीटी मुंबई लि. या कार्यालयास दि २२.१२.२०२१ रोजी अग्रेषित केलेला आहे. (सोबत पत्र जोडले आहे). |

आपल्या जर वैयक्तिक स्वरुपाच्या तक्रारी असतील तर त्यासाठी आयोगाने ग्राहक तक्रार निवारण मंच (CGRF) या यंत्रणेची निर्मिती केलेली आहे. प्रकरणारुप ग्राहक त्यांच्या तक्रारीसाठी या यंत्रणेकडे दाद मागू शकतो. सदर विनियम [महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२०] आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर मोफत स्वरूपात उतरवून घेण्याकरिता उपलब्ध करण्यात आलेले आहेत.

माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये श्री अनिलकुमार उके, संचालक (विधी) प्रभारी /प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई - ४००००५. दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३९६४/ ६५/ ६९ **Email:** anilkumar.ukey@merc.gov.in

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी